क्रमांकःसंगाबाअवि/८/सी-५२२/२०२०.
दिनांक : १५ मार्च, २०२०

# परिपत्रक

**विषय :- कोरोना विषाणू ( कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत..**

संदर्भ :- १.उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मादाम कामा रोड, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण २०२०/(सं.क.)/(११४/२०)/विशि-१, दिनांक १४ मार्च, २०२०
२.शिक्षण संचालनालय,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.उशिंस/कोरोना/मवि-१ /२०२०/३७७८, दिनांक १४ मार्च, २०२०

संदर्भांकीत पत्रामधील सूचना विचारात घेऊन उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालीका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील, अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे आणि शासकीय / अशासकीय अनुदानित / विना अनुदानित / कायम विना अनुदानित / मॉडेल डीग्री महाविद्यालये **दिनांक दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत कळविण्यात आले आहेत.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, कोरोना विषाणू (कोव्हिड १९) या विषाणूच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमिवर प्रतिबंधात्मक उपायोजनेच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भीय प्राप्त पत्रातील निर्देशानुसार **संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / शैक्षणिक संस्था (शासकीय/अशासकीय/अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित/ मॉडेल डीग्री कॉलेज) दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्यात यावे.**

या कालावधीत विद्यापीठाच्या नियोजित वेळापत्रकानुसार घेण्यात येणाऱ्या सर्व प्रात्यक्षिक आणि लेखी परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार संपन्न होतील.

परीक्षेचा अपवाद वगळता विद्यार्थी महाविद्यालयात / विद्यापीठात येणार नाहीत. याची सूचना आपल्या स्तरावरुन निर्गमित करावी या कालावधीत विनाकारण विद्यार्थी महाविद्यालयात / विद्यापीठ परिसरात येणार नाहीत याची दक्षता घ्यावी तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाहीत. याची दक्षता घेण्यासंदर्भांतही आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

**(डॉ.तुषार देशमुख)**
**कुलसचिव**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

प्रत माहितीकरीता :

१. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-३२
२. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, (उ.शि.), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे-४११ ००१
३. सहसंचालक (उच्च शिक्षण), अमरावती विभाग, अमरावती.
४. सहसंचालक, (तंत्र शिक्षण), शासकीय तंत्रनिकेतन परिसर गाडगे नगर,अमरावती.

# परिपत्रक

क्रमांक:संगाबाअवि/८/सी-        /२०२०.                                                                    दिनांक :  १८ मार्च, २०२०

**विषय :- कोरोना विषाणू ( कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत..**

संदर्भ :

१. उपसचिव,म.शा.उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण २०२०/(सं.क.)/(११४/२०)/विशि-१, दि.१४ मार्च, २०२०

२. शिक्षण संचालक,शिक्षण संचालनालय,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.उशिंस/कोरोना/मवि-१ /२०२०/३७७८, दिनांक १४ मार्च, २०२०

३. परिपत्रक क्र.संगाबाअवि/८/सी-५२२/२०२०, दि.१५ मार्च,२०२०

४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१, दिनांक १६ मार्च, २०२०

६. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.उशिंस/कोरोना/मवि-१ /२०२०/३७८७, दिनांक १६ मार्च, २०२०

७. परिपत्रक क्र.संगाबाअवि/८/सी-५४३/२०२०, दि.१७ मार्च,२०२०

वरील विषयाबाबत संदर्भ क्र.३ व ७ वरील सूचनेद्वारे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कोरोन (कोव्हिड १९) या विषाणुच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. संदर्भ क्र.४ वरील शासन पत्रान्वये खालीलप्रमाणे आदेश निर्गमित केले आहेत.

(१) संदर्भ क्र.१ वरील शासन पत्रान्वये दिलेल्या सूचना लक्षात घेता, नागरी भागासोबतच राज्यातील ग्रामीण भागातील सर्व सहकारी / अनुदानित /खाजगी शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये/ अकृषि विद्यापीठे /तंत्रज्ञान विद्यापीठे/ तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/वसतिगृहे दि.३१.०३.२०२० पर्यंत बंद राहतील.

(२) तंत्रशिक्षण /उच्च शिक्षण संचालनालयच्या अधिपत्याखालील सर्व अकृषि विद्यापीठे /तंत्रशास्त्र विद्यापीठे/ सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे/सर्व अभिमत विद्यापीठे व त्यांच्याशी संबंधित सर्व शासकीय/ अशासकीय, अनुदानित, कायम विना अनुदनित/मॉडेल डिग्री महाविद्यालये/तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये /वसतीगृहे व परिसंस्था तसेच कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था /वसतीगृहे दि.३१.०३.२०२० पर्यंत बंद राहतील.

(३) राज्यातील सर्व सरकारी /अनुदनित /खाजगी शैक्षणिक संस्था/महाविद्यालये/अकृषी विद्यापीठे/ तंत्रशास्त्र विद्यापीठे /तंत्रनिकेतने /अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र /कला महाविद्यालये यांचे दिनांक ३१.३.२०२० पर्यंत होणाऱ्या सर्व परीक्षा व प्रात्याक्षिके पुढे ढकलण्यात येत आहेत. दिनांक १.४.२०२० पासूनची परीक्षा व प्रात्यक्षिके पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील.

(४) सर्व सरकारी /अनुदानित/खाजगी शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये/अकृषी विद्यापीठे/तंत्रशास्त्र विद्यापीठे/तंत्रनिकेतन /अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र/कला महाविद्यालये या मधील सर्व अध्यापक हे दिनांक २५.३.२०२० पर्यंत घरी कामकाज (Work from Home) करु शकतील.

तथापि, आपातकालीन परिस्थिती उद्‌भवल्यास / प्रशासकीय कारणास्तव संबंधित विद्यापीठाचे कुलगुरु/प्र-कुलगुरु/कुलसचिव/उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे /तंत्रनिकेतनांचे प्राचार्य/संचालक/अधिष्ठाता यांनी निर्देश दिल्यास त्यानुसार अध्यापकांना संस्थेमध्ये तातडीने हजर राहणे बंधनकारक राहील.

(५) विद्यापीठाचे कुलगुरु/प्र-कुलगुरु/कुलसचिव/उपकुलसचिव तसेच महाविद्यालयाचे/तंत्रनिकेतनांचे प्राचार्य /संचालक/अधिष्ठाता व सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी नियमितरित्या कार्यालयामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे.

(६) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत आयोजित केलेल्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत.

(७) विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक यांनी सदर कालावधीत सार्वजनिक समारंभ, गर्दीची ठिकाणे अथवा अशा जागांपासून दूर राहावे. तद्वतच, विविध राष्ट्रीय-राज्यस्तरीय परिषदा, चर्चासत्रे, कार्यशाळा, मुलाखती, CAS च्या मुलाखती, स्नेहसंमेलने, निरोप समारंभ यांचे आयोजन तुर्तास पुढे ढकलण्यात यावे.

(८) उपरोक्त उपाययोजनाबाबत आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाहीच्या सूचना वेळोवेळी देण्यात येतील.

वरील विषयासंदर्भात शासनाचे दिनांक १६.३.२०२० रोजीच्या आदेशास अनुसरुन मा.कुलगुरुंनी दिलेल्या निर्देशान्वये सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त शासन आदेशाचे कृपया तंतोतंत पालन करण्यात यावे. विद्यापीठाद्वारे वरील विषयासंदर्भात यापुर्वी निर्गमित केलेल्या संदर्भ क्रमांक ३ व ७ वरील कार्यालयीन परित्रकातील सूचना यानंतर देखील लागू राहतील, याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी व यासंबंधी केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल विद्यापीठास तातडीने सादर करावा.

**(डॉ.तुषार देशमुख)**
**कुलसचिव**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी** :
प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**प्रत माहितीकरीता** :

१. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-३२
२. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, (उ.शि.), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे-४११ ००१
३. सहसंचालक (उच्च शिक्षण), अमरावती विभाग, अमरावती.
४. सहसंचालक, (तंत्र शिक्षण), शासकीय तंत्रनिकेतन परिसर गाडगे नगर,अमरावती.

***